## महाराष्ट्र शासन

### महसूल व वनविभाग

**उपवनसंरक्षक सातारा वनविभाग सातारा यांचे कार्यालय**
**जुनी ट्रेझरी,तहसिल कार्यालय सातारा आवार**
**क्र.ब./१२/आस्था/ ४१४७ /२०१२-१३**
**सातारा - ४१५००१ दिनांक ३०/१२/२०१२.**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक. एसआरव्ही--२०१२/ प्र.क्र.१८६/१२ दिनांक २५.७.२०१२ चे लगत मुख्य वनसंरक्षक(प्रा) कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/भरती/४५५१ दि.२९/१२/२०१२ अन्वये गट क व ड संवर्गातील सरळसेवा कोटयातील पदापैकी मंजुर पदाच्या प्रतिवर्षी कमाल ३% इतक्या कमाल मर्यादेपर्यंत रिक्त पदे विहीत कार्यपध्दतीने भरणेबाबत मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार गट क संवर्गातील २ पदे व गट ड संवर्गातील १ पद अशी एकूण ३ पदे भरण्याचे आयोजित करणेत आले आहे. त्यानुसार सातारा वनविभागाच्या आस्थापनेवरील वनविभाग, वनसंशोधन, वन्यजीव, सामाजिक वनीकरण विभाग सातारा अतर्गत खाली नमूद केलेल्या वाहनचालक, लिपिक-टंकलेखक व माळी संवर्गाच्या मान्यता देण्यात आलेल्या रिक्त पदासाठी, सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवाराकडून, खालील अटीच्या अधिन राहून स्पर्धा परिक्षेसाठी (लेखी व मौखिक) **महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित पुणे (Maharashtra Knowledge Corporation Ltd.(MKCL) Pune यांचेमार्फत** अर्ज मागवणेत येत आहेत.

| **गट क - वाहनचालक संवर्गातील रिक्त पद -१ (वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे (पीबी -१) ५२०० - २०२०० या वेतनबँडमध्ये रु.१९०० ग्रेड वेतनावर )** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.न. | जात प्रवर्ग | रिक्त पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | |
| | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | पदवीधर अशंकालीन | राष्ट्रीय खेळाडू | सर्वसाधारण |
| १ | इ.मा.व. | **१** | ० | **१** | ० | ० | ० | ० |
| | एकूण | **१** | ० | **१** | ० | ० | ० | **०** |

| **गट क - लिपिक-टंकलेखक संवर्गातील रिक्त पद -१ (वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे (पीबी - १ ) ५२०० - २०२०० या वेतनबँडमध्ये रु.१९०० ग्रेड वेतनावर )** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.न. | जात प्रवर्ग | रिक्त पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | |
| | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | पदवीधर अशंकालीन | राष्ट्रीय खेळाडू | सर्वसाधारण |
| १ | विमूक्त जाती- अ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | एकूण | **१** | ० | ० | १ | ० | ० | **०** |

| **गट ड - माळी संवर्गातील रिक्त पद -१ (वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे (१ - एस) ४४४० - ७४४० या वेतनबँडमध्ये रु.१३०० ग्रेड वेतनावर )** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.न. | जात प्रवर्ग | रिक्त पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | |
| | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | पदवीधर अशंकालीन | राष्ट्रीय खेळाडू | सर्वसाधारण |
| १ | अनु.जमाती | **१** | **१** | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | **१** | **१** | ० | **०** | ० | ० | ० |

**जाहिरातीत उल्लेख केलेल्या पदसंरव्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

टिप **:-** १) समांतर आरक्षणानुसार माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त इत्यादी प्रवर्गातील उमेदवारांना देय असलेल्या सवलती देणेत
येतील.

२) वाहनचालक या रिक्त पदासाठी फक्त पुरूष उमेदवारांनीच अर्ज करावेत.

३) समांतर आरक्षणांतर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहीत केलेल्या टक्केवारीनुसार जागा निश्चितपणे मिळण्यासाठी त्या
त्या प्रवर्गातील उमेदवारातून जागा भरणेत येतील.

**अ) वाहनचालक/लिपिक-टंकलेखक /माळी वयोमर्यादा.**

१) उमेदवाराचे वय दिनांक ३१.१२.२०१२ रोजी किमान १८ वर्षे व खुल्या प्रवर्गासाठी कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीय
उमेदवारासाठी कमाल ३८ असावे.

२) माजी सैनिक /प्रकल्पग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वय ४५ वर्ष असावे.

३) वनविभागातील अधिसंख्य वनमजूरांना महसूल व वनविभाग शासन शुध्दीपत्रक क्र.एलएबी -१०९४/ प्रक्र -
२५२/ह-९ दि.३१.०७.२००३ नुसार वयोमर्यादेसंबधी अट शिथिलक्षम.

**ब) वाहनचालक पदासाठी अर्हता**

१) उमेदवार इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक.

२) मोटर वाहन कायदा १९८८ नुसार अर्जदार हा सक्षम प्राधिका-याकडील हलके अथवा जड वाहन चालवणेची
अनुज्ञप्ती धारण केलेली असावी. मोटार वाहन चालवणेचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.

३) मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

४) मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक.

५) उमेदवाराने उत्तम शरिरयष्टी धारण केलेली असावी व त्यास सातारा व इतर जिल्हयाची भौगोलिक माहिती
असणे आवश्यक.

**क) लिपिक-टंकलेखक पदासाठी अर्हता.**

१) अर्जदाराने माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (एस. एस. सी.) धारण करणे आवश्यक.

२) अर्जदाराने **लिपिक-टंकलेखक पदासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे मराठी ३० श.प्र.मि.किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि.टंकलेखनाची अर्हता दिनाक ३१.१२.१२ पुर्वी** धारण करणे आवश्यक.आहे.

३) संगणक अर्हता प्राप्त प्रमाणपत्र -(अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A
किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य
उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती
नंतर विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दि.६/१०/१०
अन्वये प्रक्रल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या घटकातील उमेदवारांना टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होणेसाठी नियुक्ती
दिनांकापासून ६ महिने इतक्या कालावधीची मुदत देणेत येईल.

**ड ) माळी पदासाठी अर्हता**

१) उमेदवार इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक.

C:\Documents and Settings\zenith\Desktop\forest new add\recrutment2013 adv.doc

२) मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
३) उमेदवाराने उत्तम शरिरयष्टी धारण केलेली असावी.
४) माळी या पदासाठी शासन मान्य प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र व ३ वर्ष काम केलेचा अनुभवाचा दाखला.

**इ) सर्वसाधारण अटी व शर्ती**

१) उमेदवारांने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलविणेचा हक्क अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

२) प्राथमिक छाननी अंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारणेत आलेले नाहीत अशा उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

३) अ) वाहनचालक पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची प्रथम ५० गुणाची लेखी परिक्षा घेणेत येईल. लेखी परिक्षेत पात्र झालेल्या उमेदवारांची व्यावसाईक चाचणी ४० गुणाची घेणेत येईल. व्यावसाईक चाचणीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची मौखिक चाचणी १० गुणाची घेणेत येईल.

ब) लिपिक-टंकलेखक पदासाठी अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांची शासन सामान्या प्रशासन विभाग निर्णय क्रं. प्रानिम-२००७/प्रक्र ४६/ ०७/१३-अ दि. १९.१०.२००७ नुसार मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नाकरीता एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल तसेच गुणवत्ता यादीत अंर्तभूत करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहिल. लिपिक टंकलेखक पदासाठी मुलाकत घेतली जाणार नाही. अंतिम निवड ही उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार केली जाईल.

क) माळी या पदाकरीता ७५ गुणाची वस्तूनिष्ठ व बहुपर्याय प्रश्न असलेली लेखी परिक्षा घेणेत येईल.शासनाचे निर्देशाप्रमाणे लेखी परिक्षेमध्ये पात्र उमेदवारांची २५ गुणांची मौखिक चाचणी घेणेत येईल.

इ) वाहनचालक, लिपिक-टंकलेखक व माळी या संवर्गाच्या पदसंख्येस अनुसरून किती उमेदवारांना मौखिक चाचणीसाठी बोलवावयाचे यांचा निर्णय सदस्य सचिव घेतील. उमेदवारांच्या एकत्रित गुणवत्तेनुसार अंतीम निवड करणेत येईल.

फ) सदरची लेखी व मौखिक परिक्षा सातारा येथील परीक्षा केद्रावर घेण्यात येईल. याबाबत परिक्षेचा दिनांक, वेळ व परिक्षा केंद्र प्रवेशपत्राव्दारे **लेखी MKCL मार्फत** कळवणेत येईल.

४) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्यासंदर्भातील सक्षम अधिका-यांने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैद्यता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) साक्षांकित प्रत जोडावी.

५) आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैध प्रमाणपत्र शासनाचे म.शा.सा.प्र.विभाग यांचेकडील शा.नि.क्र.बीसीसी -२०११/ प्र.क्र.१०६४ /२०११/ १६-ब दि.१२/१२/११ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ठ मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे अशा उमेदवारांस त्याच्या जात प्रमाणपत्राची वैद्यता तपासणीच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती दिली जाईल.परंतू नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैद्यता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने प्राप्त जात प्रमाणपत्र अवैद्य ठरवले तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश रद्द करणेत येईल.

६) उमेदवारांना शारिरीक क्षमताचाचणी परिक्षा व मुलाखती करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

७) उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

८) लेखी परिक्षेमध्ये फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

९) माजी सैनिक /प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षण प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांनी त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**फ) सूचना**

१) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्र करणेत येणार असलेने परिक्षेसाठी विहीत केलेला नमुना अर्ज MKCL च्या अधिकृत्त प्रशिक्षण केंद्र (ALC.Authorised Learning Centre) वर विहीतकालावधीत उपलब्ध होतील.या अधिकृत ALC ची माहिती http://oasis.mkcl.org/forest2013 या संकेत स्थळावर मिळेल. सदर परिक्षेसाठी विहीत नमुन्यातील अर्जाची किंमत रु.२५/- (रु.पंचवीस फक्त) राहील ती रोखीने उपरोक्त ALC वर देऊन परिक्षेसाठी विहीत नमुन्यातील अर्ज उपलब्ध / प्राप्त करुन घ्यावा.

२) सदर परिक्षेसाठी विहीत नमुन्यातील अर्ज अधिकृत्त ALC वर दिनांक १.१.२०१३ पासून उपलब्ध राहतील .सदर अर्ज स्विकारणेची अंतीम तारीख ३१.०१.२०१३ रोजी सायंकाळी ६.०० पर्यत राहील. त्यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. उमेदवाराने MKCL च्या अधिकृत्त प्रशिक्षण केंद्रामार्फत ALC वर भरलेले अर्जच स्विकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. यांची विशेष नोंद घ्यावी. पोस्टाव्दारे, स्पीडपोस्ट, कुरीअर्सव्दारे आलेले अर्ज स्विकारणेत येणार नाहीत.

३) उमेदवारांने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटो खाली दर्शवलेल्या ठिकाणी स्वाक्षरी करावी. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात आलेल्या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती MKCL च्या ALC वर उपलब्ध राहील.

४) सर्वसाधारण (खुल्या प्रवर्गातील) उमेदवारासाठी रक्कम रु.४००/-(रु.चारशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रक्कम रु.२००/- (रु.दोनशे) फक्त परिक्षा शुल्क असून रोखीने अर्जासोबत MKCL च्या अधिकृत्त प्रशिक्षण केद्रावर (ALC) भरावे. माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरणेची अट नाही. सदरचे आवेदन शुल्क हे ना परतावा राहील.

५) परिपुर्ण अर्ज स्विकारण्याची सोय MKCL च्या अधिकृत्त ALC केद्रावर करण्यात आलेली आहे. अर्ज परिपूर्ण असल्यासच स्विकारला जाईल व त्याबाबतची पोहोच व उमेदवाराने भरलेल्या अर्जाचा गोषवारा तक्ता (Summary Sheet) सदर अधिकृत्त केंद्राकडून त्याचवेळेस दिली जाईल.

६) उमेदवारांनी ज्या ALC प्रशिक्षण केंदावरुन अर्ज प्राप्त करुन घेतले त्याच ALC केद्रावर आवश्यक ते कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

७) जिल्हा रोजगार व स्वयंम रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय व जिल्हा पुनर्वसन कार्यालय इत्यादि कार्यालयाकडे नोंदणी केली असलेल्या त्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी. सदर उमेदवारांनीही परिक्षेसाठी विहीत केलेला नमुना अर्ज MKCL च्या अधिकृत्त प्रशिक्षण केंद्र ALC वर विहीत कालावधीत उपलब्ध करुन घेऊन MKCL च्या अधिकृत्त प्रशिक्षण केंद्रामार्फत ALC वर भरावेत.

८) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, आधिवास दाखला तसेच जातीचा दाखला उपलब्ध असलेस जात वैद्यता प्रमाणपत्र, अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती उमेदवार/अर्जदार वगळून इतरासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non- Cremy-layer Certificate) च्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. असे नॉनक्रिमेलिअर प्रमाणपत्र हे दिनांक ३१.३.१३ या दिनांकापर्यत वैद्य असणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केंद्र /राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी /पोस्ट मास्तर/मुख्याध्यापक याबाबत प्राधिकृत्त व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

९) सामान्य प्रशासंन विभाग अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०००/प्रक्र.१७/२०१०/१२ दि.२८.३.२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्रक्र.१७/२०००/१२ दि.०१.०७.२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटुबांचे प्रमाणपत्र ) नियम २००५ अन्वये अर्ज करणा-या सर्व उमेदवारांनी त्यांचे अर्जासोबत दिनांक २८.३.२००५ रोजी हयात असलेली व त्यांनतर जन्माला आलेल्या अपंत्याच्या संख्येबाबत विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करावे. (प्रतिज्ञापत्राचा नमुना सोबत दिलेला आहे) प्रतिज्ञाप्रत्रातील माहिती अपूर्ण अथवा चुकीची असल्यास अथवा त्यावर स्वाक्षरी नसलेस अर्ज अपात्र ठरेल.

१०) वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारासाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय,सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५ दि.३०-६-२००६ सोबतच्या सुधारित नमुन्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर सुधारित प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारल्यास योग्य समजता येईल. खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति / गटातील (क्रिमीलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

११) अर्जामध्ये नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास संबधीत उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील, तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकणेत पात्र राहील व भारतीय दंड सहितांचे कलम १९९ व २०० (दोन) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

१२) उमेदवारांस वैद्यकिय चाचणीस अधिन राहून पात्र उमेदवारांना नेमणूक आदेश सक्षम प्राधिका-याकडून निर्गमित करणेत येतील.

१३) पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरीकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

१४) नियूक्ती केलेल्या उमेदवारांची आंतरवृत्तीय बदली होणार नाही याची संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१५) नियुक्ती होणा-या उमेदवारांस शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर २००५ अनुसार लागू करणेत आलेली परिभाषित
अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१६) उमेदवारांनी लेखी व मुलाखतीच्या वेळी खालील नमुन्यातील ओळखपत्र सोबत आणावे. सदरचे ओळखपत्र सर्व
भरती प्रक्रियेसाठी आवश्यक राहील.

१७) वाहनचालक / लिपिक-टंकलेखक /माळी भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

(अ) अर्ज करण्याचा कालावधी - दिनांक ०१.०१.२०१३ पासून दि. ३१.०१.२०१३.

(ब) लेखी परिक्षेचा दिनांक :-

१) वाहनचालक /माळी पदासाठी दि. २२.०२.२०१३ सकाळी ११ते दुपारी १२ पर्यत.

२) लिपिक-टंकलेखक पदासाठी दि. २२.०२.२०१३ वेळ दुपारी १३ ते दुपारी १५ पर्यत.

(क) लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारांने ज्या ALC केद्रावर अर्ज दाखल केला आहे त्या ALC केद्रावरुन दिनांक
०१.०२.२०१३ ते दि.२१.०२.२०१३ पर्यत वैयक्तिकरित्या प्राप्त करून घ्यावे.

(अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण (MKCL Website - संकेतस्थळ http://oasis.mkcl.org/
forest2013 ही वेबसाईट दि.०१.०१.२०१३ पासून कार्यरत होईल)

ठिकाण :- सातारा
दिनांक :- ३०.१२.२०१२

सही /-
(एन.आर. प्रवीण)
सदस्य सचिव जिल्हा निवड समिती
तथा
उपवनसंरक्षक
सातारा वनविभाग सातारा

सही /-
(डॉ.रामास्वामी एन.)
अध्यक्ष जिल्हा निवड समिती
तथा
जिल्हाधिकारी सातारा

## महाराष्ट्र शासन
## महसूल व वन विभाग.

सातारा वनविभाग सातारा यांचे आस्थापनेवरील वाहनचालक, लिपिक-टंकलेखक व माळी रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात दि.३१ डिसेंबर,२०१२ रोजीचे दैनिक पुढारी सातारा या आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.सदर जाहिरातीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**जाहिरातीमधील प्रसिध्द तपशिल**

**गट ड - माळी संवर्गातील रिक्त पद -१**
**(वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे (१ - एस) ४४४० - ७४४० या वेतनबँडमध्ये रु.१३०० ग्रेड वेतनावर )**

| अ. न. | जात प्रवर्ग | रिक्त पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | पदवीधर / अशंकालीन | राष्ट्रीय खेळाडू | सर्वसाधारण |
| १ | अनु. जमाती | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | २ | १ | ० | १ | ० | ० | ० |

**जाहिरातीसाठी सुधारित तपशिल**

**गट ड - माळी संवर्गातील रिक्त पद -१**
**(वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे (१ - एस) ४४४० - ७४४० या वेतनबँडमध्ये रु.१३०० ग्रेड वेतनावर )**

| अ. न. | जात प्रवर्ग | रिक्त पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | पदवीधर / अशंकालीन | राष्ट्रीय खेळाडू | सर्वसाधारण |
| १ | अनु.जमाती | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |

**टीप -:- जाहिरातीतील नमुद माळी या पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी उपरोक्त बदलाची नोंद घ्यावी.**

( एन.आर.प्रवीण.)
सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती
तथा
उपवनसंरक्षक
सातारा वनविभाग सातारा